अनुसूचित जाती व नवबौध्दांच्या मुलांची शासकीय निवासी शाळा अर्जुनी मोरगाव या निवासी शाळेच्या इमारत बांधकामास प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः बीसीएच-२०१८/प्र.क्र.३४६/बांधकामे
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय विस्तार, मुंबई- ४०० ०३२
दिनांक: ३१ जुलै, २०१९

संदर्भ :-

१) शासन निर्णय, सामाजिक न्याय, सांस्कृति कार्य व विशेष सहाय्य विभाग, क्र.अजाशा-२००५/प्र.क्र.४३२/मावक-४, दि. १/६/२००६

२) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,क्र. बीसीएच-२००६/प्र.क्र.३९५/ मावक-४, दि. ४/६/२००७.

३) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र. बीसीएच-२०१७/प्र.क्र. २३८/शिक्षण-२, दि.२२/२/२०१८.

४) आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, पुणे यांचे पत्र क्र. सकआ/ शिक्षण/ अर्जुनी मोरगाव/बांधकाम/प्र.मान्यता/२०१८-१९/३५८६, दि. ६/१०/२०१८.

प्रस्तावना :-

शासन संदर्भीय दि. १ जून, २००६ च्या शासन निर्णयान्वये अनुसूचित जाती व नवबौध्द मुलां-मुलींकरीता १०० शासकीय निवासी शाळा सुरू करण्यास मान्यता देण्यात आली असून संदर्भीय क्र.३ येथील दि. २२/२/२०१८ च्या शासन निर्णयान्वये अनुसूचित जाती व नवबौध्द मुलांची शासकीय निवासी शाळा अर्जुनी मोरगाव या निवासी शाळेस मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. त्यानुषंगाने, आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, पुणे यांनी दि.६/१०/२०१८ च्या पत्रान्वये उपरोक्त निवासी शाळेच्या बांधकामाचा प्रस्ताव शासनास सादर केला आहे. उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णयः-

आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांनी अनुसूचित जाती व नवबौध्द मुलांची शासकीय निवासी शाळा अर्जुनी मोरगाव या निवासी शाळेचा रु.१४,९७,४६,३३५/- एवढ्या रकमेचा प्रस्ताव शासनास सादर केला आहे. उपरोक्त प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभागास तांत्रिक बाबींची छाननी व प्रशासकीय सहमती दर्शविण्याकरीता सादर केला असता सार्वजनिक बांधकाम विभागाने रू.१४,१८,८३,४७९/- इतक्या रकमेच्या प्रस्तावास मान्यता देण्यास सहमती दर्शविली आहे. त्यानुषंगाने, अनुसूचित जाती व नवबौध्द मुलांची शासकीय निवासी शाळा अर्जुनी मोरगाव या निवासी शाळेच्या प्रस्तावास खालील अटींच्या अधीन राहून या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

अ) काम सुरु करण्यापूर्वी नमुना नकाशा, मांडणी नकाशा तसेच विस्तृत नकाशास वास्तुविशारदांकडून मंजूरी घेऊनच सुरु करावे.

ब) ढोबळ स्वरुपात धरण्यात आलेल्या तरतूदीबाबत काम करतेवेळी विस्तृत अंदाजपत्रक करुन काम हाती घ्यावे.

क) प्रत्यक्ष काम करतेवेळी पर्यावरण विभाग, शासन निर्णय क्र. इएनव्ही-२०१३/ प्र.क्र.१७७/तां.क.१. दि. १० जानेवारी, २०१४ मध्ये उल्लेख करण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्वांनुसार कार्यवाही करण्यात यावी.

ड) सदर कामाच्या बांधकामाचा खर्च सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या नियतव्ययामधून करण्यात यावा.

इ) सार्वजनिक बांधकाम विभागाच्या शासन निर्णय क्रमांक बीडीजी-२०१७/ प्र.क्र.६०/इमारती-२, दि.७/७/२०१७ अन्वये कार्यवाही करण्यात यावी.

ई) सदर अंदाजपत्रकास मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नागपूर तसेच उपभोक्ता विभागाच्या वतीने प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण विभाग, नागपूर यांचे साक्षांकन आवश्यक आहे.

उ) नियोजित जागा उपभोक्ता विभागाच्या ताब्यात असल्याचे प्रमाणपत्र प्राप्त करुन सदर कामाच्या निविदा सूचना प्रसिध्द करण्यात याव्यात.

३. अनुसूचित जाती व नवबौध्द मुलांची शासकीय निवासी शाळा, अर्जुनी मोरगाव या निवासी शाळेच्या इमारत बांधकामाच्या सविस्तर अंदाजपत्रकास सक्षम प्राधिकाऱ्याची तांत्रिक मान्यता प्राप्त करुन, विहित नियमानुसार अटी व शर्ती निश्चित करुन ई-निविदा प्रसिध्द करण्याची कार्यवाही कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग, गोंदिया यांनी तात्काळ करावी. ई-निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर, ई-निविदा प्रक्रियेची सर्व कागदपत्रे सामाजिक न्याय विभागाकडे (उपभोक्ता विभाग) दायित्व मंजूरीसाठी पाठविण्यात यावीत. सामाजिक न्याय विभागाची अंतिम मान्यता झाल्यानंतरच बांधकामाबाबतची पुढील कार्यवाही करण्यात यावी.

४. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या छाननीअंती Recapitulation Sheet प्रमाणे प्रस्तावित करण्यात आलेली रु.१४,१८,८३,४७९/- (अक्षरी रूपये चौदा कोटी अठरा लक्ष त्र्याऐंशी हजार चारशे एकोणऐंशी फक्त) इतकी रक्कम परिगणीत करण्यात आली असून Recapitulation Sheet पुढीलप्रमाणे आहे.

Name of the Department : SOCIAL JUSTICE DEPTT.					
Name of Work : Construction of Residential School Building for S.C. and Navbuddhist Boys, at Arjuni/Mor. Tah.Arjuni Dist. Gondia					
RECAPITULATION SHEET					
Sr. No.	**Particulars of Items**		**Norms (Unit Rate Rs. per Sqmt./Meter/LumpSum etc.)**		**Cost Rs.**
(A)	ESSENTIAL ITEMS				
1	(a) Building Proper	3627.78	24500	per sqmt.	8,88,80,610
	(b) Number of floors	GF+2			
	(d) Cost of Construction		**(d)**		**8,88,80,610**
2	**Electrification**	Internal	5% of 1 (d)		44,44,031
		External	6% of 1 (d)		53,32,837
	Total				**97,76,867**
3	**Water Supply and Sanitation**		5% - of 1 (d)		**44,44,031**
4	**Miscellaneous Items**				
	Compound Wall	170	8000		13,60,000
	Internal Roads	100	14804		14,80,400
	CC Drain	0.50	327600		1,63,800
	Fire Fighting Arrangements		lump sum		5,00,000
	Land Development		lump sum		5,00,000
	Rain Water Harvesting		lump sum		5,00,000
	MSDCL Transformer etc		lump sum		5,00,000
	CD Work 800mm Dia	2	324000		6,48,000
	Furniture	1448.86	3000		43,46,580
	Soil Investigation		lump sum		1,00,000
	Generator/External Light		lump sum		5,00,000
	Parking		lump sum		2,00,000
	Total				**1,07,98,288**
	Sub Total (A) = (1)+(2)+(3)+(4)				**11,39,00,288**
B	**OPTIONAL ITEMS**				
Sr.	**Items**				
	Flag post/ramp				50,000
	Water main Storage, pump house,			lump sum	10,00,000
	solar energy system			lump sum	10,00,000
	Subtotal (B)				**20,50,000**
	PROJECT (A)+(B)			**(T)**	**11,59,50,288**
	Add 4% for Contingencies on (d)				**35,55,224**
	Add 3% for Green Building Concept on (d)				**26,66,418**
	Add 12% for GST on (T)				**1,39,14,035**
	Add 5% for price Escalation on (T)				**57,97,514**
	TOTAL COST OF PROJECT				**14,18,83,479**
	Say Rs.Lakhs				**1418.83**

५. यावर होणारा खर्च मागणी क्र.एन-४, सार्वजनिक बांधकाम विभाग, मुख्य लेखाशीर्ष ४२२५-अनुसूचित जातीच्या व नवबौध्दांच्या मुलामुलींकरीता शासकीय निवासी शाळा बाधंणे (अ.जा.उ.यो.) (कार्यक्रम) ५३, मोठी बांधकामे लेखाशिर्ष ४२२५ ०५०५ या लेखाशीर्षाखाली खर्ची घालून तो सन २०१९-२० या वित्तीय वर्षात करण्यात आलेल्या अर्थसंकल्पीय तरतूदीमधून भागविण्यात यावा.

६. प्रस्तुतचा शासन निर्णय, वित्तीय अधिकार, नियम पुस्तिका, १९७८, भाग पहिला, उपविभाग-पाच, अनु.क्र.१ महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिकेतील परि.क्र.१३४ खाली प्रशासनिक विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारास अनुसरुन तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.२५/१९/इमा-२, दि.२५.०१.२०१९ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय हा महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र. २०१९०७३१११३८०७५०२२ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Anil Kondaji Ahire

Digitally signed by Anil Kondaji Ahire
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Social Justice and Special Assistance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=9004dcdaa635070d60922aaa5dec8888d343a47356798e6c9cf27e4353d60e51, cn=Anil Kondaji Ahire
Date: 2019.07.31 11:48:37 +05'30'

(अ.कों. आहिरे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१) आयुक्त, समाजकल्याण, पुणे.
२) उपसचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग (इमारती-२), मंत्रालय, मुंबई-३२.
३) मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नागपूर/गोंदिया
४) अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, गोंदिया.
५) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, गोंदिया
६) महालेखापाल महाराष्ट्र १/२ (लेखापरीक्षा / लेखाअनुज्ञेयता), मुंबई/नागपूर.
७) प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण विभाग,नागपूर.
८) सहायक आयुक्त, समाजकल्याण, गोंदिया.
९) जिल्हा कोषागार अधिकारी, गोंदिया.
१०) निवडनस्ती.